# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


**दिनांक २१/१०/२०२४ (सोमवार) सायंकाळ**

---

## पो.स्टे. मौदा हद्दीमधील जुगार अड्डयावर धाड
## —: नागपूर ग्रामीण पोलीसांची कारवाई :—

दिनांक २०/१०/२०२४ रोजी पोस्टे मौदा येथील स्टाफ पोस्टे परीसरात पेट्रोलिंग करीत असताना गोपनीय सूत्रधाराकडून माहीती मिळाली की, पोस्टे मौदा हद्दीत मौजा बाबदेव शिवार येथे काही लोक ५२ ताशपत्त्यावर पैशाची बाजी लावुन हारजीतचा जुगार खेळत आहे. अशा खात्रीशीर माहिती वरून स्टाफ यांनी पोस्टे मौदा हद्दीत मौजा बाबदेव शिवार येथे जुगार अड्डयावर रेड केली असता यातील **आरोपी नामे—१) दानसाई भिमराम आचल वय ४५ वर्ष रा. बोंडे जि. गडचिरोली ह. मु. मौदा २) विनोद विनायक वडे वय ३५ वर्ष रा. कोपरा मौदा ३)विलास शंकर भांडे वय २५ वर्ष रा. गरदेव चौक मौदा ४) प्रफुल उद्दम मेश्राम वय २३ वर्ष रा. गरदेव चौक मौदा ५) सतीश पुंडलीक फुलबांधे वय ४७ वर्ष रा. माळी मोहल्ला मौदा ६) देवराव मोतीराम गोंडाणे वय ६५ वर्ष रा. ढिवर मोहल्ला मौदा ७) मंगेश तान्हाजी बोन्द्रे वय ३० वर्ष रा. गरदेव चौक मौदा ८) इंद्रजित तुळशिराम ब्राम्हणकर, वय ४८ वर्ष रा. नरसाळा मौदा** हे हारजितचा जुगार खेळ खेळतांनी मिळुन आल्याने आरोपीतांकडुन नगदी ११२७०/—रू तसेच घटनास्थळावरून २) ०६ मोबाइल किमती ५३,०००/—रू ३) ०४ लोखंडी काती किमती ४००/—रू ४) मो सा क्र एम एच ४० ए एफ २३८ होन्डा ड्रीम युगा किमती ३०,०००/—रू असा एकुण ९४६७०/—रू चा मुद्देमाल जप्त करून नमूद आरोपीतांविरुद्ध कलम १२ (ब) महाराष्ट्र जुगार अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग कन्हान श्री. संतोष गायकवाड यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे मौदा येथील ठाणेदार पोनि प्रमोद घोंगे, पोहवा देवेंद्र भुरे यांनी पार पाडली.

## पोस्टे कळमेश्वर हद्दीतील राऊळगाव परिसरात
## अवैधरित्या मोहाफुल गावठी दारू काढणाऱ्या इसमांवर कायदेशिर कार्यवाही

आगामी विधानसभा निवडणुक या अनुषंगाने कोणतेही अनुचित प्रकार घडु नये या करीता सुरक्षेतेच्या दृष्टीकोणातून मा. पोलीस अधिक्षक साहेब नागपुर जिल्हा नागपुर ग्रामिण याचे आदेशाने दि. २१/१०/२०२४ रोजी कळमेश्वर येथील राऊळगाव परिसरात मोहाफुल गावठी दारू काढणारे इसमांवर कार्यवाही करण्यात आली. अवैधरित्या मोहाफुल गावठी दारु काढणारा **आरोपी नामे-** विष्णू हेमा मारवाडी जि. नागपूर हा मोहाफुल रसायन सडवा बाळगुन मोहाफुलाची गावठी दारूची रनिग भट्टी काढतांना मिळुन आला. आरोपीचे ताब्यातून १) दोन प्लॅस्टिक डबकी मध्ये ५० लिटर मोहफुल गावठी दारू किमती ५०००/-रु २) १० प्लास्टीक ड्रम मध्ये मोहफुल रसायन सडवा प्रत्येकी २०० लिटर एकूण २००० लिटर प्रत्येकी लिटर ३५/- रुपये प्रमाणे एकूण किमती ७०,०००/- रु , ३) २ प्लास्टिक खाली डबकी किंमत ५०० रू. ४) १० प्लास्टिक ड्रम किंमत १०००० ५) दारु गाळण्याचे इतर साहित्य किंमत ५००० रू असा एकूण किंमत ९०५००/- रु चा मुद्देमाल मिळून आल्याने मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. जप्त मुद्देमाल नाश करून सॅम्पल व कागदपत्र पुढील कायदेशीर प्रक्रिये करीता पोलीस ठाणे कळमेश्वर यांचे ताब्यात देण्यात आले. वर नमूद आरोपीतां विरुद्ध कलम ६५( फ, क, ब, ई) महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. श्री. हर्ष ए पोद्दार पोलीस अधीक्षक नागपुर जिल्हा ग्रामीण, मा. श्री रमेश धुमाळ अपर पोलीस अधीक्षक नागपूर जिल्हा ग्रामीण यांचे मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक ओमप्रकाश कोकाटे, पो हवा प्रमोद तभाने, पोहवा संजय बांते, पोहवा किशोर वानखेडे, चानापोशी आशुतोष यांनी पार पाडली.

## अवैधरीत्या धारदार शस्त्र बाळगणाऱ्या आरोपीतांविरूद्ध गुन्हा नोंद

पोस्टे पारशिवनी अंतर्गत मौजा आमगाव शिवार येथे दि. २०/१०/२०२४ चे १९/५९ वा. दरम्यान यातील आरोपी नामे-१) करण गुड्डु दिवटे वय १९ रा अंबाझरी वस्ती हनुमान मंदीरजवळ नागपुर २) रेहान रशीद बेग वय २३ रा कळमना नागपुर यांनी संगणमत करून मा जिल्हाधिकारी साहेब याचा पारीत केलेले आदेशाचे उल्लंघन करून मोसा क्र एम एच ३१ एफ एम २५४७ वर बसुन अवैध्यरित्या बिना परवाना एक लोखंडी तलवार हातामध्ये बाळगुन मिळुन आले.

सदर प्रकरणी सरतर्फे फिर्यादी नामे- सफौ रामराव पवार यांचे रीपोर्ट वरून पोस्टे पारशिवनी येथे आरोपीतांविरूद्ध कलम ४/२५ भाहका सहकलम ३(५) भान्यास सहकलम १३५ मपोका अन्वये गुन्हा नोंद केला आहे.

सदरची कार्यवाही ही मा. पोलीस अधीक्षक नागपूर ग्रामीण हर्ष ए. पोद्दार (भापोसे), मा. अपर पोलीस अधीक्षक रमेश धुमाळ, मा. सहायक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी सावनेर विभाग सावनेर श्री. अनिल म्हस्के यांचे मार्गदर्शनाखाली पोस्टे पारशिवनी येथील ठाणेदार पोनि राजेशकुमार थोरात व त्यांचा स्टाफ यांनी पार पाडली.

## अकस्मात मृत्यु

पोस्टे रामटेक:— अंतर्गत मनसर रामटेक येथे दि. १९/१०/२०२४ रोजी चे १५.३० वा. दरम्यान यातील **मृतक नामे—** मुकेश विजय सोमकुवर वय ३५ चर्ष रा. वार्ड क्र.०३ मनसर हा मिस्त्री काम करत असताना विजेच्या ताराला लोखंडी रॉड लागून करंट लागल्याने मरण पावला.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे— पूंडवन विजय सोमकुवर वय ४२ चर्ष रा. वार्ड क्र.०३ मनसर ता.रामटेक यांच्या रीपोर्ट वरून पोस्टे रामटेक येथे मर्ग क्र. ७८/२४ कलम १९४ बी.एन.एस.एस अन्वये मर्ग नोंद केला आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर